**जिल्हा परिषद,यवतमाळ**
**कार्यालय,शिक्षण विभाग,प्राथमिक**
**दुसरा माळा, प्रशासकीय इमारतआर्णी रोड ,, यवतमाळ**
E-mail – eopriytl@gmail.com दुरध्वनी क्र. 07232244295-

---

यजिप/शिविप्रा/ कावि/१-आस्था/३३७८ /२०२४ यवतमाळ दिनांक:- ०२-०७-२०२४

शिक्षक अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणी २०२२ मुलाखती शिवाय पदनिवडीचा विकल्प दिलेल्या संस्थांमध्ये पवित्र प्रणाली अंतर्गत शिक्षक पदभरती निवडयादीतील उमेदवारांच्या कागदपत्रांची पडताळणी बाबत व पुढील आवश्यक कार्यवाही बाबत.

**जाहीर सुचना**

जिल्हा परिषद यवतमाळ द्वारा शिक्षक पदभरती करीता पवित्र प्रणालीवर दिलेल्या मराठी माध्यम १ ते ४ – २९ , ६ ते ८ (भाषा-हिंदी) – १०, ६ ते ८ (गणित-विज्ञान) – ५४ उर्दु माध्यम – १ पदांची जाहीरातीनुसार शिक्षक अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणी २०२२ यामध्ये प्राप्त गुणांच्या आधारे पवित्र प्रणालीवर एकूण मराठी माध्यम ९३ उर्दु माध्यम – १ उमेदवाराची गुणवत्ता यादी प्रसिध्द करण्यात आली आहे.

जिल्हा परिषद यवतमाळ विकल्प दिलेल्या पवित्र प्रणालीवर प्रसिध्द गुणवत्ता यादीतील उमेदवारांनी सदर यादीतील अनुक्रमांनुसार खालील प्रमाणे नमूद दिनांक व वेळेस पवित्र प्रणालीवर स्व प्रमाणपत्रामध्ये नमूद केलेली माहीती व त्या अनुषंगाने पवित्र पोर्टलवर अपलोड केलेली कागदपत्रानुसार मुळ कागपत्राचे तपासणी करीता वसंतराव नाईक (जि.प.) सभागृह जि.प. यवतमाळ येथे न चुकता उपस्थित राहावे.

| अ.क्र. | पवित्र प्रणालीवर प्रसिध्द यादीतील उमेदवाराचा अ.क्र. | मुळ कागदपत्रे तपासणीकरीता उपस्थित राहण्याचा दिनांक | वेळ |
|---|---|---|---|
| १ | गुणवतत्तेनुसार १ ते ४७ | ०८/०७/२०२४ | सकाळी ११.०० |
| २ | ४८ ते ९३ + उर्दु - १ | ०९/०७/२०२४ | सकाळी ११.०० |

**अर्जदारांनी मुळ दस्तऐवज पडताळणी दरम्यान खालील कागदपत्रे/प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे.**

१. पवित्र प्रणालीवर अपलोड केलेले स्वप्रमाणपत्राची प्रत.
२. शाळा महाविद्यालय सोडल्याचे प्रमाणपत्र.
३. निवड यादी नुसार सदर पदास आवश्यक असलेले अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणी २०२२ (TAIT-२०२२ व TET २०२२) प्रमाणपत्र.
४. शैक्षणिक अर्हतेचे प्रमाणपत्र (गुण पत्रिका) १० वी / १२ वी / पदविधर / पदवित्तर प्रमाणपत्र व गुण पत्रिका
५. व्यावसायिक अर्हता ई. १ ली ते ५ वी करीता, व्यावसायिक अर्हता शिक्षण शास्त्र पदविका प्रमाणपत्र D.Ed / D.LEd/ D.Ted/ D.ch. प्रमाणपत्र व गुण पत्रिका.
६. व्यावसायिक अर्हता शिक्षणशास्त्र पदविका / पदवी प्रमाणपत्र गुणपत्रक.
७. वयासबंधी दाखला (जन्माचा दाखला / शाळा सोडल्याचे प्रमाणपत्राचे /शालांत परिक्षा प्रमाणपत्र)
८. अधिवास प्रमाणपत्र (एस.डी.ओ./उपजिल्हाधिकारी यांनी दिलेले) महाराष्ट्र कर्नाटक सिमा भागातील ८६५ गावातील रहीवासी प्रमाणपत्र.
९. शासकिय निम शासकिय कर्मचारी असल्यास सक्षम प्राधिकाऱ्याची मंजूरी घेतल्याचे प्रमाणपत्र
१०. छोटे कुटूंब असल्याचे प्रमाणपत्र.
११. नावात बदल असल्यास प्रमाणपत्र.
१२. नियुक्ती करीता निवड झाल्यानंतर बंदपत्र भरून देणे बंधनकारक राहील.
१३. ओळखपत्र - आधार कार्ड / ड्रायव्हिंग लायसन्स / पॅन कार्ड

शिक्षण सेवक प्राथमिक पदाकरीता निवडीसाठी मुळ दस्तऐवज तपासणी करीता बोलविण्यात येणाऱ्या उमेदवारांनी मुळ दस्तऐवज पडताळणी दरम्यान उक्त प्रमाणपत्राच्या छायांकित प्रतीच्या स्व प्रमाणित केलेली दोन प्रती व पासपोर्ट साईज फोटो न चुकता सादर करावी.

वरील मुळ कागद पत्रे प्रमाणपत्रे सादर केल्या शिवाय व सदर कागदपत्राची वैधता सिध्द झाल्याशिवाय आपली निवड केली जाणार नाही तसेच प्रमाणपत्र / कागदपत्रे सादर करण्याकरीता कुठलिही अतिरिक्त मुदत दिली जाणार नाही. व अशा उमेदवारास नियुक्ती दिली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

(प्रकाश एम.मिश्रा)
शिक्षणाधिकारी(प्राथमिक)
जिल्हा परिषद यवतमाळ